आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात देशात सरासरी ६४ पूर्णांक ५८ शतांश टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज, तेराशे एकतीस उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रात बंद

- तिसऱ्या टप्प्यातल्या मतदानानंतर आता देशभरातली २० राज्य आणि २ केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून २८३ मतदारसंघातली मतदान प्रक्रिया पूर्ण

- नीरव मोदीचा जामीन अर्ज युकेतल्या न्यायालयाने पुन्हा फेटाळला

- रशियन सैन्यात नोकरीचं आमिष दाखवून भारतीय नागरिकांची तस्करी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चार जणांना अटक

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात रंगणार

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीच्या तिसऱ्या टप्प्यात काल झालेल्या मतदानात देशभरात सरासरी ६४ पुर्णांक ५८ शतांश टक्के मतदान झालं. १० राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ९३ जागांसाठी ही मतदान प्रक्रिया पार पडली. उष्णतेची काहिली असतानाही देशभरातील बहुतांश मतदान केंद्रांवर शांततेत आणि उत्साहात मतदान झालं. आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये प्रत्येकी चार तर गोवा आणि दादरा - नगर हवेली आणि दिवदमण मध्ये प्रत्येकी दोन जागांसाठी काल लढत होती. यामध्ये तेराशे ३१ उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. काल झालेल्या निवडणूकीत भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा, मनसुख मांडवीय,

ज्योतिरादित्य शिंदे, प्रल्हाद जोशी, शिवराज सिंह चौहान आणि बसवराज बोम्मई, काँग्रेस नेते दिग्विजय सिंह, समाजवादी पक्षाच्या नेत्या डिंपल यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांच्यासह प्रमुख उमेदवार रिंगणात होते.

**<><><><><>**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सरासरी ६१ पूर्णांक ४४ शतांश टक्के मतदान झालं. संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार सर्वाधिक मतदान कोल्हापूर आणि हातकणंगले मतदारसंघात झालं. कोल्हापूरमध्ये ७० पूर्णांक ३५ शतांश टक्के, हातकणंगले इथं ६८ पूर्णांक ७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. बारामतीमध्ये सर्वात कमी ५६ पूर्णांक ७ शतांश, लातूर ६० पूर्णांक १८ शतांश, सांगली ६० पूर्णांक ९५ शतांश, माढा ६२ पूर्णांक १७ शतांश, उस्मानाबाद ६० पूर्णांक ९१ शतांश, रायगड ५८ पूर्णांक १० शतांश, रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये ५९ पूर्णांक २३ शतांश, सातारा ६३ पूर्णांक ५ शतांश आणि सोलापूरमध्ये ५७ पूर्णांक ६१ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

**<><><><><>**

तिसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर आता देशभरातील २० राज्य आणि २ केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून २८३ मतदारसंघातली मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे. भारतातल्या निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी २३ देशांतील ७५ आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींनी सहा राज्यांतील अनेक मतदान केंद्रांना भेट दिली. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मतदानाचं साहित्य आणि यंत्रे ने-आण करण्याची प्रक्रिया, तसंच कामाची पध्दत याबाबत त्यांनी अभ्यास केला. निवडणूक आयोगातर्फे राबविली जाणारी प्रक्रिया पारदर्शक असल्याचं आणि मतदारांमधील उत्साहाचं त्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी रालोआ सरकारच्या गेल्या दहा वर्षांमधल्या यशस्वी कामकाजाचं श्रेय जनतेला दिलं आहे. त्यांच्या सरकारला जनतेनं दिलेल्या मतांमुळेच संरक्षण क्षेत्रात आयातदार असणारा भारत निर्यातदार बनू शकला, काश्मीरला विशेष दर्जा देणारं कलम ३७० हटविण्यात आलं, असं प्रधानमंत्र्यांनी आंध्र प्रदेशात करीमनगर इथल्या प्रचारसभेत बोलताना सांगितलं. राष्ट्र प्रथम ही भाजपाची वचनबद्धता आहे, तर कुटुंब प्रथम, हे काँग्रेस आणि भारत राष्ट्र समितीचं धोरण असल्याची टीका त्यांनी केली. हे दोन्ही पक्ष म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यांचा भ्रष्टाचार आणि तुष्टीकरणाचं राजकारण यापासून तेलंगणाचा बचाव करण्याची गरज प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यांमधला प्रचारही जोरात सुरु आहे. महाराष्ट्रात काल भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दोन सभा झाल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औरंगाबाद मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार संदिपान भुमरे यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जळगाव मधले उमेदवार करण पवार यांच्यासाठी पक्षाध्यक्ष उद्धव ठाकरे यांची सभा झाली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रावेर मधल्या उमेदवार रक्षा खडसे यांच्या प्रचारासाठी भुसावळमधे सभा घेतली.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘**दिंडोरी आणि नाशिक**’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

**HARYANA - INDEPENDENT MLA/ पूल / गौरी**

हरयाणा विधानसभेतल्या ३ अपक्ष आमदारांनी भाजपा सरकारचा पाठिंबा काल काढून घेतला. रणधीर गोलन, धरमपाल गोंडर आणि सोमबीर सिंग संगवान या तीन अपक्ष आमदारांनी काल रोहतक इथं पत्रकार परिषदेत हा निर्णय जाहीर केला. महागाई आणि बेरोजगारी या प्रश्नांवर तोडगा निघत नसल्यानं, तसंच शेतकरी हिताच्या मुद्द्यावर आपण पाठिंबा काढून घेत असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यपाल बंदारु दत्तात्रय यांना पत्र लिहून आपला निर्णय कळवला असल्य़ाचंही ते म्हणाले. काही आमदारांनी व्यक्तिगत आकांक्षांपोटी पाठिंबा काढून घेतल्याची प्रतिक्रीया हरयाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी व्यक्त केली. ९० पैकी ४७ आमदार असल्यानं सध्या सरकारला धोका नसल्याचं मुख्यमंत्र्यांचे प्रसारमाध्यम सचिव प्रवीण आत्रेय यांनी सांगितलं. माजी मुख्यमंत्री भूपिंदरसिंग हुडा यांनी या आमदारांच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

**<><><><><>**

पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणातील प्रमुख फरार आरोपी नीरव मोदी याचा जामीन अर्ज ब्रिटनच्या न्यायालयाने फेटाळला आहे. जामीन दिल्यास आरोपी न्यायाच्या कचाट्यातून सुटून पुन्हा पळून जाण्याचा मोठा धोका असल्याचं न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळताना नमूद केलं आहे. गेल्या पाच वर्षांपासून लंडनच्या तुरुंगात असलेल्या नीरव मोदीने काल नव्याने जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. या सुनावणीसाठी भारतातून केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय आणि अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडी चं संयुक्त पथक ब्रिटनला रवाना झालं होतं.

**<><><><><>**

रशियन सैन्यात नोकरी मिळवून देण्याचं आमिष दाखवून भारतीय नागरिकांची तस्करी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चार जणांना सी बी आयनं अटक केली आहे. देशभरातल्या निरागस युवकांना विदेशातल्या आकर्षक नोकऱ्या मिळवून देण्याचं आमिष दाखवणारं एक मोठं रॅकेट उद्ध्वस्त केल्याचं सीबीआयनं म्हटलं आहे. भारतीय युवकांना सैन्य प्रशिक्षण देऊन त्यांच्या इच्छेविरुद्ध रशिया-युक्रेन युद्धात आघाडीवर पाठवलं जात असे. या प्रकरणी केरळ आणि मुंबई इथून प्रत्येकी दोघांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

केरळच्या तीन जिल्ह्यांमध्ये वेस्ट नाईल तापाचे रुग्ण आढळून आले आहेत. या पार्श्वभूमीवर केरळ सरकारने राज्यातल्या सर्व जिल्ह्यांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. क्युलेक्स डासांमुळे पसरणारा हा तापसदृश आजार असून त्रिशूर, मलप्पुरम आणि कोझिकोळ जिल्ह्यात त्याचा प्रादुर्भाव आढळल्याच्या वृत्ताला राज्याच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी दुजोरा दिला आहे. सर्व जिल्ह्यांनी डास नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले असून, डोकेदुखी, उलट्या, स्नायू दुखणे, खाज सुटणे यासारखी लक्षणं दिसल्यास त्वरित उपचार घेण्याचं आवाहन आरोग्य विभागाने केलं आहे. सध्या तरी या विषाणूविरूद्ध कोणतेही औषध किंवा लस उपलब्ध नाही. केरळमध्ये २०११ साली पहिल्यांदा या प्रकारचा ताप आढळून आला होता.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. प्ले ऑफमधे पोहचण्यासाठी दोन्ही संघांसाठी हा सामना खूप महत्त्वाचा असणार आहे. दरम्यान

काल झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं राजस्थान रॉयल्सवर २० धावांनी विजय मिळवला.

<><><><><>

व्हिएतनाममध्ये झालेल्या आशियाई खुल्या पिकलबॉल विजेतेपद स्पर्धेत, भारतानं काल तीन सुवर्ण आणि दोन कास्यपदकं मिळवली. सचिन पाहवा आणि प्रियांका छाब्रा यांनी मिश्र दुहेरीच्या ३५ वर्षांवरच्या गटात रुबेन हेलबर्ग आणि चितलादा हेमासी यांचा ११-९, ५-११, ११-९ असा पराभव करत भारताला स्पर्धेतलं पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. महिला दुहेरीच्या खुल्या गटात ईशा लखानी आणि पेई चुआन काओ जोडीने, डांग किम नान आणि टायक के यांच्यावर १५-७, १५-३ असा विजय मिळवत सुवर्णपदक पटकावलं. पुरुष दुहेरीत अनिकेत पाटील आणि रोहित पाटील या जोडीने सुवर्णपदक मिळवलं. या शिवाय एकेरीत विजय मेनन आणि प्रियांका छाब्रा यांनी कांस्यपदकाची कमाई केली.

<><><><><>

केरळ मध्ये एअर इंडिया एक्स्प्रेस विमान कंपनीच्या वैमानिकांनी काल रात्री अचानक संप पुकारल्यामुळे प्रवाशांचे अतोनात हाल झाले. या संपाबाबत कंपनीने प्रवाशांना कोणतीही पूर्वसूचना दिली नव्हती, विमानतळावर आल्यावरच त्यांना संपाबाबत माहिती मिळाली. या संपाचा फटका सुमारे ४०० प्रवाशांना बसला.

//<><><><><>//